# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/05/2023 (सोमवार) सायंकाळ

---

## अवैध रेती (गौणखनिज) साठयावर स्थानिक

## गुन्हे शाखेची धाड

मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण यांनी दिलेल्या आदेशावरून स्थानिक गुन्हे शाखेतील पथकाने अवैध रेतीचा साठयावर कारवाई करून पोस्टे पारशिवनी हद्दीत तामसवाडी शिवारात लांभा ब्रिक जवळ तसेच गोपाल मेहाडीया यांचे ब्रिक्स जवळ खुल्या जागेत रेड टाकुन अवैध रेतीचा साठयावर कारवाई करून एकुण ११५ ब्रास रेतीचा साठा किंमती अंदाजे ३४५०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करून अवैधरीत्या विनापरवाना रेती (गौणखनिज) चा साठयावर आळा घालुन दंडात्मक कारवाई करण्याकरीता मा. तहसिलदार तहसिल कार्यालय पारशिवनी यांचे कडुन योग्य कारवाई करवुन घेणेकरीता पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीण पोलीस अधीक्षक मा. श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार गजेंद्र चौधरी, रोशन काळे, पोलीस नायक विपीन गायधने यांचे पथकाने पार पाडली.



## अपघातात मृत्यु

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत १.५ कि. मी. अंतरावरील मौजा रामनगर येथे दिनांक १३/०५/२०२३ चे १९.०० वा. ते १९.३० वा. सुमारास यातील **मृतक नामे– रमेश भाउराव धुर्व रा. सवरणी ता. संसर जि. छिदंवाडा (म.प्र.)** हा त्याचे गावावरून दि. १३/०५/२०२३ चे सकाळी ११/०० वा. चे सुमारास त्याची सासुरवाडी रामटेकडी देवलापार येथे भेटायला आला होता दारू पीवुन असल्याने सासुरवाडीला न थांबता घटना तारखेला परत त्याचे गावाला सवरनीला देवलापार रामनगर नॅशनल हायवे रोड क्र. ४४ ने जात असता त्याचे मोटरसायकलचे मागेहुन कोणत्यातरी अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन रमेश धुर्व यांच्या मोटरसायकलला जोरदार धडक मारली ज्यामुळे रमेश धुर्व हा मोटरसायकल सहीत १० ते १५ फुटावर फरफटत जावुन गंभीर जखमी झाला त्याच्या डोक्याला, छातीला व डावे पायाला अपघातामुळे जबर मार लागल्याने जागीच मरण पावल्याने अज्ञात वाहन चालक कारणीभुत ठरलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलीस हवालदार राकेश नलगुंडवार ब. नं. १६९७ पोस्टे देवलापार यांचे रीपोर्ट वरून पोलीस स्टेशन देवलापार येथे अज्ञात आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ, भांदवि. सहकलम १८४ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि. शरद गायकवाड मो. क्र. ९९२३९८८२९२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर